# महात्मा बसवेश्वर

(सन ११३१-११६७)

(अल्प परिचय)

वीरशैव धर्माचे पुनरूज्जीवन करणारी एक महान विभूती. कर्नाटक ही त्यांची कर्मभूमी. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांचा जन्म बागेवाडी (जि. विजापूर) येथे झाला. त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. दरसाल त्याच दिवशी बसवेश्वर जयंती साजरी केली जाते.

महात्मा बसवेश्वर यांच्या आईचे नाव मादलांबिके व वडिलांचे मादिराज होते. बसवेश्वरांना शिवाचा अवतार मानतात. वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर "मला आधीच दीक्षा मिळाली आहे" असे म्हणून त्यांनी मुंज करून घ्यावयाचे नाकारले आणि घर सोडून ते कुडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कुडलसंगम हे स्थान कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावर आहे. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञाने इत्यादींचा अभ्यास केला.

बसवेश्वरांचा उदय होण्यापूर्वी कर्नाटकात अनेक धर्म व पंथ प्रचलित होते. परंतु ही संयुक्त धर्मपरंपरा अवनत अवस्थेतच होती. या पाश्वभूमीवर बसवेश्वरांनी शिव हा एकमेव ईश्वर असल्याची घोषणा करून शिवोपासनेचा पुरस्कार केला. त्यांच्या उत्कट शिवभक्तीमुळे त्यांना भक्तिभांडारी असे नाव प्राप्त झाले. ते कुडलसंगम येथील संगमेश्वराचे निष्ठावंत भक्त होते. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादींचा प्रचार केला. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती.

बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली "शिवानुभवमंटप" म्हणजेच "अनुभवमंटप" ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. बसवेश्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही, भाष्ये लिहिली नाहीत वा प्रवासही केला नाही, परंतु मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. या मंटपातील शून्यपीठाचे अध्यक्षपद *अल्लमप्रभू* (बारावे शतक) यांना देण्यात आले होते. येथे होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून बसवेश्वरांनी वेगवेगळ्या जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.

महात्मा बसवेश्वर यांना यज्ञयागांतील पशुहत्या, वर्णभेद, वर्गभेद व जातीभेद मान्य नव्हते. त्यामुळे सनातनी लोकांनी त्यांच्याविषयी बिज्जल राजाचे मन कलुषित केले. शेवटी बिज्जल राजाचे सैन्य व बसवेश्वरांचे अनुयायी यांच्यात झगडा सुरू झाला. तेव्हा या हिंसाचाराला कंटाळून ते कुडलसंगम येथे गेले व त्यांनी तेथे समाधी घेतली. कुडलसंगम येथे त्यांची समाधी आहे. दरवर्षी श्रावण शुध्द प्रतिपदेला त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)